दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
www.raigadnagari.com
/ raigadnagari

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

वर्ष २० वे | अंक २६६ | MAHMAR/2006/17212 | रायगड | बुधवार, दि.२४ डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

# रायगडातील पर्यटनस्थळे हाऊसफुल्ल

## नाताळ, नववर्षाच्या स्वागतासाठी पर्यटकांची पसंती; समुद्रकिनारे गजबजले



**दै.रायगड नगरी । रत्नाकर पाटील**

**अलिबाग ।** नाताळ आणि सरत्या वर्षाला निरोप, तसेच नववर्ष स्वागतासाठी पर्यटकांची पावले मोठ्या संख्येने रायगडातील पर्यटनस्थळांकडे वळली आहेत. रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनारे, थंड हवेचे ठिकाण माथेरानसह इतर पर्यटनस्थळे पर्यटकांनी गजबजली आहेत.

नाताळ, सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे स्वागत मोठ्या जल्लोषात करण्यात येत आहे. डिसेंबरचा अखेरचा आठवडा असल्याने सुट्ट्यांचा हंगाम आहे. अशात आता पर्यटकांची पावले रायगडमधील पर्यटनस्थळांकडे वळली आहेत. मोठ्या संख्येने या ठिकाणांवर पर्यटक आले आहेत. जिल्ह्यातील अलिबाग, आक्षी, नागाव, किहीम, काशिद, मुरूड, दिवेआगर, हरिहरेश्वर, श्रीवर्धन आणि माथेरान या पर्यटनस्थळी पर्यटक मोठ्या संख्येने पोहोचले आहेत. समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची गर्दी झाली आहे. किनारे गजबजून गेले आहेत. नाताळ २५ डिसेंबर ते ३१ डिसेंबरपर्यंत या पर्यटनस्थळांवरील हॉटेल्स हे आरक्षित असल्याचे येथील व्यावसायिकांकडून सांगण्यात येत आहे.

विस्तीर्ण व स्वच्छ समुद्रकिनारे, नारळी पोफळीच्या बागा, वनराई, गडकिल्ले, लेण्यांचे पर्यटकांना नेहमीच अप्रुप राहिले आहे. नाताळचा सण आणि लागून आलेल्या सुट्ट्यांचा आनंद लुटण्यासाठी राज्यातील विविध भागांतून पर्यटकांचा ओघ रायगड जिल्ह्यात वाढल्याचे दिसते.

# श्रीवर्धन तालुक्यात क्षमतेपेक्षा जास्त बॉक्साइडची वाहतूक जोमात

## पण तालुका प्रशासन कोमात, उत्खननाकडे प्रशासनाची सपशेल डोळेझाक

**दै.रायगड नगरी । संतोष चौकर**

**श्रीवर्धन ।** श्रीवर्धन तालुक्यात क्षमतेपेक्षा जास्त बॉक्साइडची वाहतूक अत्यंत जोमात सुरू आहे. त्याचप्रमाणे बॉक्साइडचे उत्खनन परवानगी न घेता किंवा घेतलेल्या परवानगी पेक्षा जास्त पटीने करून अनेकांनी पैसे कमावण्याचा धंदा जोरात सुरू ठेवलेला आहे. मात्र या सर्व प्रकाराकडे तालुका प्रशासनाने पूर्णपणे काणाडोळा केला आहे. क्षमतेपेक्षा जास्त बॉक्साईट घेऊन जाणारे दहा चाकी डंपर बॉक्साईड खाणी पासून वडघर पांगलोली, त्याचप्रमाणे चांदोरे या ठिकाणी बॉक्साइडची वाहतूक करत असतात. याबाबत पेणचे प्रादेशिक परिवहन आधिकारी महादेव सूर्यवंशी यांच्याजवळ संपर्क साधला असता त्यांनी सदर क्षमतेपेक्षा जास्त अवजड वाहतुकी वरती कारवाई करण्यात येईल असे आश्वासन दिले होते.

मात्र प्रत्यक्षात अद्याप कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही. श्रीवर्धन तालुक्यात विविध राजकीय पक्षांशी संबंधित असलेले स्थानिक नेते आपल्या सोयीनुसार बॉक्साइडचा धंदा जोरात चालवण्यासाठी पक्षांतर करून देखील मोकळे झाले आहेत. श्रीवर्धन तालुक्यात दिवसेंदिवस पर्यटन वाढत आहे. या ठिकाणी येणारा पर्यटक हा या ठिकाणच्या निसर्ग



सौंदर्याची भुरळ पडल्यामुळे येत असतो. परंतु दिवसेंदिवस बॉक्साइड उत्खनन करून श्रीवर्धन परिसरातील वनसंपत्ती व डोंगर पूर्णपणे उघडे होत चालले आहेत. भविष्यात अशाच प्रकारे बॉक्साइड उत्खनन सुरू राहिले तर या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर भूस्खलना सारखे प्रकार झाल्याशिवाय राहणार नाहीत.

बॉक्साइडचे उत्खनन करणाऱ्या कंपन्यांना अटी व शर्ती घालून दिलेल्या असतात. यामध्ये बॉक्साइड उत्खनन केलेल्या ठिकाणी पुन्हा मातीचा भराव करून त्यावरती झाडे लागवड करण्याची अट आहे. परंतु अशा प्रकारे कोणत्याही उत्खनन करणाऱ्या कंपनीकडून झाडे लावण्यात येत नाहीत. बॉक्साईड उत्खनन करताना किती टनाची रॉयल्टी भरली आहे व किती टन बॉक्साइड काढले जात आहे. यावर कोणत्याही शासकीय यंत्रणेचे लक्ष नाही. या ठिकाणी आंधळ दळतंय कुत्र पीठ खातय या म्हणीच्या उक्ती प्रमाणे कारभार सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. श्रीवर्धन तालुक्यात होत असलेल्या क्षमतेपेक्षा जास्त बॉक्साइड वाहतूक व फॉरकॉन कंपनीच्या दगड वाहतुकीमुळे तालुक्यातील रस्त्यांची वाट लागत आहे.

अनेक नवीन बनवलेले रस्ते बऱ्याच ठिकाणी खचत आहेत. श्रीवर्धन शहरातील नगरपालिका हद्दीतील रस्ते तर पूर्णपणे ढासळले आहेत. मात्र पेण येथील प्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी या सर्व प्रकाराकडे डोळेझाक करत आहेत. जर प्रादेशिक परिवहन विभागाने या क्षमतेपेक्षा जास्त अवजड वाहतकीवर कारवाई केली नाही. तर राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेणार असल्याचे काही नागरिकांनी बोलून दाखविले आहे. अनेक वेळा बॉक्साइडची वाहतूक करणाऱ्या डंपर्समुळे अपघात देखील झालेले आहेत. परंतु प्रशासन या कोणत्याही प्रकाराकडे लक्ष देत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

तसेच कर्नाटक राज्यातून येणारे अनेक लांबच लांब अवजड वाहतूक करणारे ट्रक या ठिकाणी रोडवरती फिरत असल्यामुळे अनेक वेळा वाहतूक कोंडी होण्याचा प्रकार देखील घडतो. तरी या परराज्यातून येणाऱ्या अवजड वाहतूक करणाऱ्या ट्रक वरती सुद्धा प्रादेशिक परिवहन विभागाने कारवाई करण्याची आवश्यकता आहे. प्रशासनाने या बाबतीत ठोस निर्णय न घेतल्यास श्रीवर्धन मधील जनतेच्या उद्रेकाला प्रशासनाला सामोरे जावे लागणार आहे.

# बलकरच्या धडकेने पती-पत्नीचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील पळ-स्पे कडुन पेण कडे जाणा-या गोवा महामार्ग वरील क्षणभर विश्रांती हॉटेल समोर एका बलकरने ओला कंपनीच्या इलेक्ट्रीक स्कुटी गाडीस धडक दिल्याने झालेल्या अपघातात गाडीवरील पतिपत्नीचा दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे .

बलकर कमांक एम एच ४६ सी यु २३०६ ही घेऊन चालक क्षणभर विश्रांती हॉटेल समोरील पेणकडे जाणा-या रोडवर विरूध्द दिशेने जात असताना त्याने भरधाव वेगाने रस्त्याच्या विरूध्द दिशेने चालवुन ओला कंपनीची इलेक्ट्रीक स्कुटी नंबर एम एच ४६ सी टी ७१२२ हीस धडक दिल्याने झालेल्या अपघातात गाडीवरील विदया विठठल गायकर वय ५१ या गंभीररित्या जखमी होऊन जागीच मयत झाल्या तर त्याचे



पती विठठल गायकर वय ५४ राहणार मुक्काम डोलघर पोस्ट बारापाडा हे गंभीररित्या जखमी झाल्याने त्यांना उपच-ारार्थ रुग्णालयात दाखल केले असता तेथे त्यांचा दुर्देवी मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### प्रशासन गाव की ओर सुशासन सप्ताह जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न

# प्रशासनाने नागरिकांच्या समस्या सोडविण्यावर भर द्यावा : जिल्हाधिकारी किशन जावळे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

माजी प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त केंद्र शासनाने देशव्यापी सुशासन सप्ताह सुरु केला आहे. प्रशासन जनतेसाठी काय करते याची माहिती व्हावी, हा या सप्ताहाचा प्रमुख उद्देश आहे. जिल्हा प्रशासनाने सर्वसामान्य जनतेला सेवा सुविधा उपलब्ध करून देवून नागरिकांच्या समस्या सोडविण्यावर भर द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.

सुशासन सप्ताहाच्या अनुषंगाने जिल्ह-ास्तरीय कार्यशाळा आज जिल्हा नियोजन समिती सभागृहात पार पडली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हाधिकारी रायगड एच.के.जावळे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) डॉ.रविंद्र शेळके तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी आदी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी श्री.जावळे म्हणाले, शहरीकरण जरी वाढत असले, तरी गावांमध्ये मोठ्या संख्येने ग्रामस्थ राहत असतात. येणाऱ्या नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करणे, हे आपले प्रमुख काम आहे. त्यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन करणे, सार्वजनिक तक्रारी निर्गत करणे, ऑनलाईन सेवेमधील विलंबितता टाळून त्या पुरविणे आदी कामे गतीने करावीत. आपल्याकडे आलेल्या नागरिकांच्या वैयक्तिक किंवा सामाजिक समस्या व्यवस्थितपणे ऐकून घेत त्यांना प्रत्येक अधिकारी,कर्मचाऱ्यांने हसतमुखाने उत्तर देवून त्यांच्या समस्यांचे निराकरण करावे, अशा सूचनांही त्यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या. आपण लोकांसाठी आहोत याची जाणीव प्रत्येकाला असणे तितकेच महत्वाचे आहे.

आपल्याला जे पद मिळाले आहे त्या पदाचा उपयोग सर्व सामान्य जनतेच्या कामासाठी वापरले पाहिजे. प्रत्येकाने कामकाज केल्यानंतर त्याचे लिखाण करणे अत्यंत गरजेचे आहे. प्रशासन गाव की ओर ही एक अतिशय महत्वाची थिम असून अधिकारी, कर्मचाऱ्यांना चांगले काम करण्याची संधी आहे. प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हाधिकारी रायगड एच.के.जावळे मार्गदर्शन करताना म्हणाले, केंद्र शासनाच्या प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभागाच्या निर्देशानुसार या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. हा केंद्र शासनाचा स्तुत्य उपक्रम असून कामकाज करताना पारदर्शकता असली पाहिजे आणि कामकाज विहित वेळेत पूर्ण झाली पाहिजेत. रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आदिवासी वाड्या, वस्त्या असून शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत त्यांच्या असलेल्या समस्या संवाद सेतू या उपक्रमातून सोडविण्यावर भर द्यावा, असेही निर्देशही त्यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना दिले. या उपक्रमात सार्वजनिक सेवेचे वितरण, तक्रार निवारण, पारदर्शकता या तीन महत्वाच्या बाबी आहेत. कायदा व व्यवहाराची सांगड घालून तसेच मानवी दृष्टीकोन व सहानुभूतीचा दृष्टीकोन ठेवून जनतेचे प्रश्न सोडवावेत. प्रशासकीय सेवा करताना आपण गोरगरीब जनतेची सेवा करतो त्याचे पुण्य आपल्याला नक्कीच मिळते.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) रविंद्र शेळके यांनी मानले. या कार्यशाळेवेळी प्रत्येक शासकीय विभागांनी मागील वर्षात जिल्ह्यात सुशासन उपक्रमांतर्गत राबविलेल्या योजनांची माहिती संगणकीय सादरीकरणाद्वारे उपस्थितांना दाखविण्यात आली.

# 'रामबाग' उद्यानाचा वर्धापनदिन सोहळा उत्साहात साजरा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्राच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या आणि लाखो निसर्गप्रेमींच्या गळ्यातील ताईत असलेल्या पनवेल तालुक्यातील न्हावेखाडी येथील 'रामबाग' या अतिसुंदर उद्यानाचा तृतीय वर्धापन दिन सोहळा हजारों नागरिकांच्या साक्षीने मोठ्या उत्साहात सोमवारी सायंकाळी साजरा झाला.

नयनरम्य वातावरण, आकर्षक विद्युत रोषणाई, उत्तम नियोजन आणि लहानग्यांपासून युवक, महिला, ज्येष्ठांची उपस्थितीने रामबाग नंदनवन प्रमाणे फुलले होते. आणि त्यातच पारंपरिक आगरी-कोळीगीतांच्या बहारदार कार्यक्रमाने वातावरणात स्फूर्ती आणली होती. स्वतःच्या संपत्तीतून लोकांच्या सेवेसाठी उभारलेली 'रामबाग' ही वास्तू न्हावे पंचक्रोशीतीलच नव्हे तर पनवेल, उरण, रायगड नवी मुंबई आणि पर्यायाने महाराष्ट्राच्या गौरवाची ठरली आहे,

विशेष म्हणजे 'रामबाग' आता पर्यटनस्थळ म्हणून उदयास आले आहे. थोर दानशूर व्यक्तिमत्व आणि सर्व समाजाचे आधारस्तंभ असलेले माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त न्हावे आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थ आणि म्हसेश्वर मंदिर समिती आणि रामबाग व्यवस्थापन कमिटीच्यावतीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा हृदय सत्कार करून त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यात आला.

या सोहळ्याला खासदार धैयशील पाटील, माजी मंत्री व विद्यमान आमदार रवीशेठ पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, दिबासाहेबांचे चिरंजीव अतुल पाटील, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी शहराध्यक्ष अनिल भगत, सरपंच विजेंद्र पाटील, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, रामबाग व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष सागर ठाकूर, श्री. म्हसेश्वर मंदिर कमिटी अध्यक्ष सि. एल. ठाकूर यांच्यासह इतर मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. या कार्यक्रमाला स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी उपस्थित होते.

# एप्स्टीन फाइल्स

एप्स्टीन फाइल्स हा विषय गेल्या काही महिन्यांपासून आंतरराष्ट्रीय राजकारण तसेच प्रसारमाध्यमे आणि समाजमाध्यमांमधील चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या एका भाकितामुळे भारतातही एप्स्टीन फाइल्सची जोरात चर्चा झाली. चव्हाण यांनी एप्स्टीन फाइल्सचा थेट उल्लेख केला नव्हता; पण त्यांनी भाकीत प्रत्यक्षात उतरण्यासाठी दिलेली तारीख आणि एप्स्टीन फाइल्स सार्वजनिक करण्यासाठी निर्धारित तारीख एकच असल्याने, स्वाभाविकपणे चव्हाण यांच्या वक्तव्याचा संबंध एप्स्टीन फाइल्ससोबत जोडण्यात आला. अल्पवयीन मुलींच्या लैंगिक शोषणाच्या आरोपांमुळे कुख्यात ठरलेला अमेरिकन उद्योगपती जेफ्री एप्स्टीन, त्याचा कारागृहातील रहस्यमय मृत्यू आणि त्याच्या संपर्कातील राजकीय, प्रशासकीय, उद्योग, मनोरंजन आदी क्षेत्रांतील जगभरातील प्रभावशाली व्यक्ती, यामुळे हा विषय जागतिक पातळीवर संवेदनशील बनला आहे. एप्स्टीनच्या संपर्कातील अनेक प्रभावशाली व्यक्तींच्या चौकशीसाठी गोळा करण्यात आलेले दस्तऐवज 'एप्स्टीन फाइल्स' म्हणून ओळखले जातात. पृथ्वीराज चव्हाण यांनी काही दिवसांपूर्वी, १९ डिसेंबरला देशातील सर्वात मोठा राजकीय भूकंप होईल, पंतप्रधान बदलेल आणि पुढचा पंतप्रधान मराठी असेल, असे भाकीत करून राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली होती. चव्हाणांच्या विधानानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींचे समर्थक आणि विरोधक १९ डिसेंबरची आतुरतेने वाट पाहू लागले. विरोधक तर जणू पाण्यात देव बुडवूनच बसले होते ! समाजमाध्यमांवर अटकळी, विश्लेषणे आणि अफवांचा अक्षरशः पूर आला होता; मात्र राजकारणात अनेकदा घडते तसे, वास्तव अटकळींपेक्षा निराळे ठरले. पूर्वनिर्धारित कार्यक्रमानुसार १९ डिसेंबरला एप्स्टीन फाइल्सचा पहिला भाग सार्वजनिक झाला खरा; परंतु त्यात मोदी आणि केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्या संदर्भातील काही अत्यंत त्रोटक, संदर्भहीन उल्लेख वगळता, भारताशी संबंधित अन्य कोणतीही ठोस माहिती नव्हती. ना कोणते गंभीर आरोप, ना कोणते पुरावे, ना कोणती राजकीय खळबळ! त्यामुळे 'फाइल्स उघड होताच सत्ताबदल अटळ' ही अनेकांची अपेक्षा फोल ठरली. सार्वजनिक झालेल्या फाइल्समध्ये मुख्यत्वे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, माजी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन, ब्रिटनचे प्रिन्स एड्रयू यांच्यासह काही अमेरिकन राजकारणी, उद्योगपती आणि प्रसिद्ध व्यक्तींच्या नावांचा उल्लेख आहे. काही 'गौप्यस्फोट' वाटावे असे तपशीलही समोर आले; मात्र त्यातील बरेचसे मुद्दे आधीच माध्यमांत चर्चेत आलेले होते. त्यानंतर एप्स्टीन फाइल्सची आणखी एक खेप सार्वजनिक झाली; पण त्यातही भारताशी संबंधित काहीही नव्हते. येथे एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतो. विदेशात तपास कागदपत्रे उघड होत असताना भारतीय राजकारणात इतकी अतिरंजित अपेक्षा का निर्माण झाली? या प्रश्नाचे एक उत्तर म्हणजे टोकाचे ध्रुवीकरण झालेले राजकारण ! मोदी समर्थक आणि विरोधकांतील संघर्ष एवढा तीव्र झाला आहे, की कोणताही घटनाक्रम तात्काळ राजकीय गणितात बसवण्याचा प्रयत्न होतो. दुसरे म्हणजे माध्यमांची भूमिका ! 'ब्रेकिंग न्यूज'च्या स्पर्धेत अनेकदा तपासाधीन, अपूर्ण किंवा संदर्भविरहित माहितीवर मोठे निष्कर्ष काढले जातात. एप्स्टीन प्रकरण मुळात काय आहे, हे समजून घेतल्याशिवाय त्याचे भारतीय संदर्भ जोडणे धोकादायक ठरते. एप्स्टीन अमेरिकन नागरिक होता. त्याचे गुन्हे अमेरिका आणि काही पाश्चात्त्य देशांतील घटनांशी संबंधित आहेत. अमेरिकेतील तपास यंत्रणा, न्यायालये आणि राजकीय यंत्रणा या फाइल्सच्या आधारे पुढील कारवाई करतील किंवा नाही, हा त्यांचा अंतर्गत विषय आहे. केवळ नावांचा उल्लेख म्हणजे दोषसिद्धी नव्हे, हा प्राथमिक न्यायसिद्धांत आहे. त्यामुळे भारतात बसून पंतप्रधान पायउतार होण्याचे भाकीत करणे, ही जबाबदार राजकीय भूमिका म्हणता येणार नाही. या प्रकरणातून काही धडे घ्यायला हवे. पहिला म्हणजे तथ्यांची पडताळणी ! कोणतीही आंतरराष्ट्रीय कागदपत्रे, गुप्त फाइल्स किंवा फुटलेल्या अहवालांचा अर्थ लावताना संयम आवश्यक आहे. दुसरा धडा म्हणजे राजकीय वक्तव्यांची विश्वासार्हता ! चुकीची भाकिते केवळ नेत्याची विश्वासार्हताच कमी करत नाहीत, तर राजकीय चर्चेचा दर्जाही घसरवतात ! कोणत्याही आंतरराष्ट्रीय प्रकरणात ठोस पुरावे नसताना भारताचे नाव ओढणे देशाच्या प्रतिमेला अनावश्यक धक्का देणारे ठरू शकते. भारत लोकशाही, घटनात्मक प्रक्रिया आणि कायद्याच्या चौकटीत चालणारा देश आहे. येथे सत्ताबदल सोशल मीडियावरील अटकळींनुसार नव्हे, तर जनादेशानुसार होतात! या संपूर्ण घटनाक्रमाने एवढेच अधोरेखित केले, की आंतरराष्ट्रीय घडामोडींचा वापर देशांतर्गत राजकीय आकसापोटी करणे योग्य नव्हे !

# लोकनेते अशोकदादा साबळे पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगाव शहरासह संपूर्ण रायगड जिल्ह्यात सहकार क्षेत्रात विश्वासार्हतेचे प्रतीक म्हणून ओळखली जाणारी लोकनेते अशोक दादा साबळे पतसंस्था यांच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन अत्यंत उत्साहात व साधेपणाने पार पडले. सोमवार, दिनांक २२ डिसेंबर रोजी पतसंस्थेच्या कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात व्हाइस चेअरमन प्रशांत साबळे यांच्या शुभहस्ते दिनदर्शिकेचे अनावरण करण्यात आले.



या प्रसंगी पतसंस्थेचे चेअरमन अरुण पवार, व्हाइस चेअरमन प्रशांत साबळे, सेक्रेटरी संजय ओसवाल, सल्लागार सुरेश जैन, ज्येष्ठ संचालक महादेव कनोजे, हेमंत शेठ, दिलीप कांबळे, व्यवस्थापक मनोज मुंडे, वसुली अधिकारी बाळासाहेब पवार, ज्येष्ठ लिपिक विजय जाधव, कॅशियर सुखदा धुमाळ, तसेच निलेश रातवडकर, बाबू कळमकर, सुमित पारखे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

लोकनेते अशोक दादा साबळे पतसंस्थेने आपल्या कार्यकाळात सहकार क्षेत्रात आदर्शवत वाटचाल केली असून यंदा संस्थेच्या स्थापनेला २३ वर्षे पूर्ण झाली आहेत. विशेष म्हणजे स्थापनेपासून आजपर्यंत सतत नफ्यात राहणारी रायगड जिल्ह्यातील एकमेव पतसंस्था म्हणून या संस्थेचा लौकिक आहे. सध्या संस्थेचे ४२ कोटी रुपयांचे भागभांडवल, सुमारे १० कोटी रुपयांच्या ठेवी असून वार्षिक उलाढाल ४१ कोटी रुपये इतकी आहे. या २३ वर्षांच्या यशस्वी प्रवासात संस्थेने हजारो बेरोजगार युवक-युवतींना स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी कर्जाच्या माध्यमातून आर्थिक पाठबळ देत सामाजिक बांधिलकी जपली आहे. त्यामुळे ही पतसंस्था केवळ आर्थिक व्यवहारांची संस्था न राहता समाजाच्या सर्वांगीण विकासाची भागीदार ठरली आहे.

यावेळी बोलताना चेअरमन अरुण पवार यांनी सांगितले की, यंदाची दिनदर्शिका अत्यंत आकर्षक, सुबक व माहितीपूर्ण स्वरूपात तयार करण्यात आली असून ती सर्वसामान्य नागरिक, व्यापारी, उद्योजक, नोकरदार, गृहीणी तसेच विद्यार्थी वर्गासाठीही उपयुक्त ठरेल. दिनदर्शिकेच्या प्रकाशनानिमित्त उपस्थित मान्यवरांनी पतसंस्थेच्या कार्याचा गौरव करत पुढील काळातही ही संस्था सहकार क्षेत्रात नवे आदर्श निर्माण करेल, असा विश्वास व्यक्त केला.

# लोकसहभागातून बेलघर येथे वनराई बंधारा

**दै.रायगड नगरी । तळा**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत तळा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत चरई खुर्द येथील बेलघर येथे ग्रामस्थांनी लोकसहभागातून वनराई बंधारा बांधला आहे. पाणी हे जीवनाचे मूलभूत साधन आहे. वाढती लोकसंख्या, बदलते हवामान आणि अनियंत्रित पाणीवापर यांमुळे आज अनेक भागांत पाण्याची तीव्र टंचाई जाणवते. या समस्येवर प्रभावी व पर्यावरणपूरक उपाय म्हणून वनराई बंधारा ही संकल्पना महत्त्वाची ठरते.

या बंधाऱ्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे लोकसहभाग. गावकरी एकत्र येऊन श्रमदान करतात, नियोजन करतात आणि बंधाऱ्याची देखभालही करतात. त्यामुळे सामूहिक जबाबदारीची भावना निर्माण होते. वनराई बंधारा हा कमी खर्चाचा, टिकाऊ आणि पर्यावरणस्नेही उपाय असून तो स्थानिक पातळीवर पाणीप्रश्न सोडविण्यास प्रभावी ठरतो. वनराई बंधाऱ्यासारख्या उपक्रमांतून जलसंधारण साध्य करून आपण निसर्गाचे संतुलन राखू शकतो आणि भावी पिढ्यांसाठी पाण्याची सुरक्षितता सुनिश्चित करू शकतो.कपडे धुवणे व गुरांसाठी या वनराईबंधाऱ्याचा फायदा होईल.

वनराई बंधारा म्हणजे नदी, ओढा किंवा नाल्यावर कमी खर्चात उभारला जाणारा लघु बंधारा. हा बंधारा प्रामुख्याने माती, दगड, वाळू, सिमेंटच्या गोण्या किंवा स्थानिक उपलब्ध साहित्य वापरून तयार केला जातो. लोकसहभागातून उभारले जाणारे हे बंधारे आहेत. वनराई बंधाऱ्यांचे अनेक फायदे आहेत. प्रथम, भूजलपातळी वाढते, त्यामुळे विहिरी, बोअरवेल आणि हातपंपांना वर्षभर पाणी मिळते. दुसरे म्हणजे शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढते, परिणामी पीक उत्पादनात सुधारणा होते. तिसरे, मृदाक्षय (माती धूप) कमी होतो आणि परिसरातील हरित आवरण वाढते. चौथे, दुष्काळी परिस्थितीत गावांना दिलासा मिळतो.



# बेलोशी येथे आगरी समाज संस्थेच्या माध्यमातून साडी वाटप कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

आगरी समाज संस्था यांच्या माध्यमातून तसेच श्री मरुबाई मंदिर ट्रस्ट व अष्टमुद्रा प्रतिष्ठान, मुंबई यांच्या विद्यमाने बेलोशी गावात महिलासाठी साडी वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन माझेरी विभाग आगरी समाज यांच्यावतीने करण्यात आले होते. बेलोशी येथील श्री जरीमरी मंदिरात हा कार्यक्रम पार पडला असून महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.



कार्यक्रमाच्या सुरुवातीस आगरी समाज संस्थेचे अध्यक्ष निलेश पाटील यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी समाजातील एकतेचे महत्त्व, संभाव्य संकटांची जाणीव करून देत आगरी समाजाची कष्टकरी परंपरा आणि सर्वांप्रती असलेली मदतीची भावना प्रभावीपणे मांडली. यानंतर मधुकर गावंड यांनी समाजाच्या एकीवर भर देत आगरी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आगरी समाज संस्थेसोबत एकजुटीने राहण्याचे आवाहन केले. अनिल गावंड यांनी मरुबाई देवीचे महात्म्य सांगत आगरी समाज भविष्यात कसा प्रगतीच्या मार्गावर जाऊ शकतो याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

यावेळी बेलोशी गावचे सरपंच कृष्णा भोपी तसेच जयवंत थळे यांनी आपले अनुभव सांगत सध्या समाज मोठ्या प्रमाणात आगरी समाज संस्थेसोबत जोडला जात असल्याचे नमूद केले. शशिकांत मिठाग्री यांनी आगरी समाज संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती देत संस्थेच्या विवाहमिलन वधू-वर परिचय केंद्रामध्ये १२ वीपर्यंत शिक्षण घेतलेल्या विवाहोच्छुक मुलींची मोफत नोंदणी करण्यात येणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रमोद भोपी यांनी केले.

या कार्यक्रमाला आगरी समाज संस्थेचे सचिव प्रभाकर ठाकूर, मनोहर पाटील, ज्येष्ठ सल्लागार अनंत म्हात्रे, प्रकाश मिठागरी, श्रेयस ठाकूर, निलेश वारगे, जगदिश भोपी, सुभाष वारगे, द्वारकानाथ गुंड, हरिश्चंद्र भोपी, राकेश भोपी, रणधीर मढवी, विलास वारगे, संतोष भोपी आदी कार्यकर्ते मोठ्या उत्साहाने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सक्रिय सहभागी झाले होते. सामाजिक एकात्मतेचा संदेश देणारा हा साडी वाटप कार्यक्रम ग्रामीण भागातील महिलांसाठी आनंददायी ठरला असून उपस्थितांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले.

# रमेश गुडेकर यांच्या हस्ते करण्यात आले २०२६ च्या वार्षिक कॅलेंडरचे उद्घाटन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

नंदकिशोर धोत्रे चॅरिटेबल ट्रस्ट आणि तसेच पत्रकार संरक्षण समिती, अन्याय अत्याचार भ्रष्टाचार विरोधी समिती, वृत्तपत्र शिवानंद, मल्हार न्यूज, लायन्स क्लब ऑफ पनवेल, या संघटनांच्या संयुक्त विद्यमाने तयार केलेले वर्ष २०२६ च्या वार्षिक कॅलेंडरचे उद्घाटन पनवेल येथे, माजी नगरसेवक लोकप्रिय समाजसेवक आणि तरुणांच्या गळ्यातील ताईत अशी ओळख असलेले रमेश गुडेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

दादांनी अनुमोदन देताना दादांना बोलण्यात वेगळाच सूर गवसला होता. संपादक नंदकिशोर धोत्रे आणि त्यांच्या टीमला त्यांनी शुभेच्छा देत सर्वांचे कौतुक केले. व तसेच प्रसार माध्यमांशी बोलताना, माजी इलेक्शन अधिकारी टी एन शेषन यांचे बद्दल बोलत असताना, दादा म्हणाले की जी शेषन साहेबांनी नियमांची अंमलबजावणी केली होती तशी अंमलबजावणी पुढील अधिकाऱ्यांनी कडकरित्या अवलंबली नाही त्याबद्दल रमेश गुडेकर यांनी खेद व्यक्त केला. तसेच सर्व राजकीय पक्षांवरही दादा घसरून पडले. त्यांच्या भाषणात आता पक्ष न राहता त्याचे पक्षी झालेले आहेत आणि हे पक्षी एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर उड्या घेत आहेत आणि इतर फांद्याही त्याचं स्वखुशीने स्वागत करत आहेत असे उपहासात्मक स्वतः चे मत सादर केले.

सर्वांना नवीन वर्षाच्या पुनश्चः शुभेच्छा देत आपले मनोगत संपविले. सदर कार्यक्रमांमध्ये पत्रकार गिरीश भोपी, गुरुनाथ धुमाळ, सौ. सुवर्णा ठाकूर अजित कर्णिक, सौ. नूतन धोत्रे तसेच डेरवली येथील दुर्गामाता महिला बचत गट यांच्या अध्यक्षा गीता भोपी व सभासद सौ. गायत्री धुमाळ, सौ. हिरा नायर त्याचप्रमाणे अनमोल खिल्लारी, चिंतामण कराळे, सौ. गौरी जयस्वाल, देवांश धुमाळ, संतोषी जयस्वाल यांची उपस्थिती होती.

# राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुंबई येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत ओकिनावा शोरीन रियु कराटे डो, उडेन टी कोबुजूत्सु असोसिएशन रायगडच्या कराटेपटूंनी २ सुवर्ण, ४ रजत, ७ कांस्यपदके मिळवून चमकदार कामगिरी केली !

ओम समर्थ भारत व्यायाम मंदिर आणि महाराष्ट्र अम्यॅचुअर स्पोर्ट्स कराटे असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईत दादर येथे राज्यस्तरीय कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

त्यात राज्यभरातील अनेक कराटे संघटनांनी भाग घेतला होता. रायगड जिल्ह्यातील रसायनी व मजगाव - नांदगाव येथील शोरीन रियु कराटे डो च्या कराटेपटूंनी या स्पर्धेत एकूण १३ पदकाची कमाई केली. त्यात पुढील खेळाडूंचा समावेश आहे.

रसायनी येथील कराटेपटू शर्वरी अभिषेक तांबडकर , वैदेही समीर कुलकर्णी यांनी सुवर्ण पदक पटकाले असून शांभवी संदेश सावंत , आरंभ विश्वजीत गणतांडेल, त्रिशा नवीन गट्टू , ख़ूशी सर्वेश शेट्ये यांनी रजत पदक पटकावला असून ईश्वरी अभिषेक तांबडकर, स्वरूप उमेश जांभळे, अंश जालिंदर गहिरे तसेच काव्या केतन नाक्ती (खार मजगाव) आणि आर्यन स्वप्निल गद्रे (नांदगाव) जय गणेश ठाकूर(नांदगाव) अब्दुल रहेमान कामिल कापसे (नांदगाव)हे सर्व कांस्यपदकाचे मानकरी ठरले आहेत.

सर्व कराटेपटूंना आंतरराष्ट्रीय पंच क्योशी-विजय चंद्रकांत तांबडकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रशिक्षक रेन्शी - अभिषेक गजानन तांबडकर व सेन्सई - आकांक्षा विजय तांबडकर, सेंम्पाय - स्वप्ना अभिषेक तांबडकर यांचे मार्गदर्शन लाभले. रायगडच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत मिळविलेल्या यशाबद्दल जिल्ह्यातील क्रीडाप्रेमींकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून सर्वत्र कौतुक होत आहे.

# विद्यार्थिनीला लोकलमधून ढकलणाऱ्यास १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील एका विद्यार्थिनीला धावत्या लोकलमधून ढकलून दिल्याप्रकरणी संशयिताला न्यायालयाने त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली.

गुरुवारी (ता. १८ डिसेंबर) सकाळी आठ वाजता पनवेलहून मुंबईकडे जाणाऱ्या लोकलमध्ये ही घटना घडली.

या प्रकरणी संशयिताची तीन दिवसांची पोलीस कोठडी संपल्यानंतर त्याला पुन्हा न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते. पनवेल येथे राहणारी ही विद्यार्थिनी आपल्या मैत्रिणीसोबत खारघर येथील महाविद्यालयात जाण्यासाठी महिलांच्या डब्यातून प्रवास करत होती. याच वेळी या डब्यात घुसखोरी करणाऱ्या एका माथेफिरूला डब्यातील महिलांनी जाब विचारला. त्याचा राग मनात धरत आरोपीने दरवाजात उभ्या असलेल्या या पीडित विद्यार्थिनीला थेट धावत्या लोकलमधून बाहेर ढकलले,

आरडाओरड करत प्रवाशांनी तात्काळ आपत्कालीन साखळी ओढली. प्रवाशांच्या मदतीने जखमी विद्यार्थिनीला तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले.

कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात प्राथमिक उपचार झाल्यानंतर तिची प्रकृती स्थिर असल्याने तिला घरी सोडण्यात आले आहे. तिच्या डोके, कंबर आणि हातापायांना दुखापत झाली होती.

दरम्यान, माहिती मिळताच जीआरपी पोलिसांनी खांदेश्वर रेल्वे स्थानकात सापळा रचून संशयीत आरोपी शेख अख्तर नवाज शेख (वय ५०) याला अटक केली. तो मूळचा मुंबईतील खार रोड परिसरातील असून कायमस्वरूपी फिरस्ता असल्याचे तपासात उघड झाले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत अब्दुल रहिमान म. यूसुफ भाईजी यांच्या मालकी हक्क व कब्जेवहिवाटीचे असून आमचे अशिलांसोबत खालील नमूद मिळकत ही विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास सबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशील ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी रायगड, पोटतुकडी तालुका उरण, मे. दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा. रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील मौजे पुनाडे, येथील मिळकत भूमापन /सर्व्हे नं. १४४/४२ यांसी एकूण क्षेत्र ०.२०.५० (हे.आर.प्र.) व पोटखराबा ०.००.०० (हे.आर.प्र.), आकार रक्कम रुपये ०.०० पैसे. यांसी चतुःसीमा वहिवाटीप्रमाणे आहेत.

यांसी चतुःसीमा वहिवाटीप्रमाणे आहेत. येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त.
रायगड, तारीखः २४ डिसेंबर २०२५

सही/-
**श्री. विनायक र. ताम्हणकर, वकिल**
**खरेदीदारातर्फे वकिल**
**३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी, शनी नगर,**
**मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३**
**भ्रमणध्वनी क्र. ८६६८५५१३१२**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे कोप्रोली, तालुका पेण, जिल्हा रायगड, येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत ही १) हरिभाऊ दामोदर म्हात्रे २) दत्तात्रेय दामोदर म्हात्रे ३) महादेव दामोदर म्हात्रे यांच्या मालकीची मिळकत आहे.

**सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | पो.ख. | एकूण क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|---|---|
| कोप्रोली | १४७ | ३ | ०.२०.७० | ०.००.५० | ०.२१.२० | १.२५ |
| कोप्रोली | १५० | २ | ०.२३.३० | ०.०२.०० | ०.२५.३० | २.१२ |

नमुद केलेली मिळकत ही वरील कब्जेदारांच्या मालकी हक्कात व कब्जे वहीवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत आमचे खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबद्दल विद्यमान मालकाने सांगितले आहे. सदर मिळकतीवर कसलाही कुळ, वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनचिठ्ठी, साठकरार, खरेदीखत, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मॉर्गेज, संपादन भाडेपट्टा, मृत्युपत्रांकीत दान, जप्ती, कर्ज, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या हरकती खालील पत्त्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधुन कायदेशीर पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहित धरुन, तसेच त्यासंबधी कोणचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहित धरण्यात येईल, तसेच मागाहुन येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात घेतलेली हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. हे सर्वांस कळावे.

सदरची पेपर नोटीस देण्यात माझी कोणत्याही प्रकारची अडचण किंवा तक्रार नाही, म्हणुन मी या जाहीर नोटीसीवर सही करत आहे.
ठिकाण : उरण
दिनांक : २३/१२/२०२५

सही/-
**ॲड.स्वाती डी. कांबळे**
**ॲडव्होकेट-हायकोर्ट**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे बहिरामकोटक, तालुका पेण, जिल्हा रायगड, येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत ही देवीचंद वीरचंद मारवाडी यांच्या मालकीची मिळकत आहे.

**सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | पो.ख. | एकूण क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|---|---|
| बहिरामकोटक | १४३ | | ०.२१.२० | ०.०१.३० | ०.२२.५० | २.०६ |

नमुद केलेली मिळकत ही वरील कब्जेदारांच्या मालकी हक्कात व कब्जे वहीवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत आमचे खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबद्दल विद्यमान मालकाने सांगितले आहे. सदर मिळकतीवर कसलाही कुळ, वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनचिठ्ठी, साठकरार, खरेदीखत, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मॉर्गेज, संपादन भाडेपट्टा, मृत्युपत्रांकीत दान, जप्ती, कर्ज, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या हरकती खालील पत्त्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधुन कायदेशीर पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहित धरुन, तसेच त्यासंबधी कोणचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहित धरण्यात येईल, तसेच मागाहुन येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात घेतलेली हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. हे सर्वांस कळावे.

सदरची पेपर नोटीस देण्यात माझी कोणत्याही प्रकारची अडचण किंवा तक्रार नाही, म्हणुन मी या जाहीर नोटीसीवर सही करत आहे.
ठिकाण : उरण
दिनांक : २३/१२/२०२५

सही/-
**ॲड.स्वाती डी. कांबळे**
**ॲडव्होकेट-हायकोर्ट**

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, मी श्री.रामकृष्ण नारायण घरत, रा : ए ४०१, श्रीकृष्ण व्हीला, ०३ से, बेलपाडा, खारघर, नवी मुंबई, महाराष्ट्र यांच्या ताब्यातील सेल ॲग्रीमेंट नं.३२२८/२००९, B1004 SN पार्क हे दि.१५/१२/२०२५ रोजी खारघर परिसरात कुठेतरी पडून गहाळ झाले आहे.

त्याबाबत खारघर पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली आहे, त्याचा नं. १९५७/२०२५ दि.१५/१२/२०२५ असा आहे.

तरी याबाबत कोणाही व्यक्तीस कागदपत्रे आढळल्यास खालील पत्यावर कागदपत्रा सहित ०७ दिवसाच्या आत समक्ष भेटावे.
ठिकाण : खारघर
दिनांक : २३/१२/२०२५

सही/-
**श्री.रामकृष्ण नारायण घरत**
**रा : ए ४०१, श्रीकृष्ण व्हीला, ०३ से,**
**बेलपाडा, खारघर, नवी मुंबई, महाराष्ट्र**

Borade-Kapoor Judge
ADV SUJATA PATIL 8879416483

## PUBLIC NOTICE

PUBLIC NOTICE FOR HERESHIP CERTIFICATE
IN THE HON'BLE COURT OF CIVIL JUDGE (SD)PANVEL
Civil M.A. No.1562/2025
Exh No.6/D
N.D. 30/01/2026

Whereas deceased LATE SMT NIRMALA PANDURANG GATHADI, died intestate on 05/07/2025 at Flat No. 301, B- Wing, 3 floor, Plot No- 66, Raj Co operative Housing Society, Sector-21, Kharghar, Navi Mumbai, Dist Raigad 410210. Whereas Applicants 1) MR. VINAYAK PANDURANG GATHADI, 2 MRS. ANAGHA SHREERAM SHALGAR 3) MR. ASHISH PANDURANG GATHADI,, all residing at Flat No. 301, 11 B Wing, 3rd floor, Pint No. 66, Raj Co operative Housing Society, Sector-21, Kharghar, Navi Mumbai 410210 Application for Heirship Certificate of Legal Heirs to The Court Of Hon'ble SD Panvel. At Panvel for the purpose of faithfully administer the Legal Heir of the said decessed and in any way connecting this.

**SCHEDULE OF PROPERTY (66.66% Shared)**

a) FLAT NO. 301, B-WING, PLOT NO-66, 3rd FLOOR, RAJ CO-OPERATIVE HOUSING SOCIETY, SECTOR-21, KHARGHAR, NAVI MUMBAI 410210.
HAVING ADMEASURING AREA ABOUT
34.85 SQ METER CARPET Agreement ValueRs. 4,98,000
(Four Lakhs Ninety Eight Thousand Only)

**b) SCHEDULE OF PROPERTY (100% Share)**

ABHINAV CO-OP-HOUSING SOCIETY, D.RT. NO 19. VISHWASNAGAR, AURAGABAD, HOUSE NO-133196, YOJNA NO, OC21/01/02/A2/84/0L PLOT NO. 84, PLOT CITY SURVEY 71, MAYANAGAR MUKUNDWADI, SECTOR A2/N-2 SAMBHAJI NAGAR (AURANGABAD) 431003 ADMEASURING AREA ABOUT 3000 SQ.FT.
Agreement Value-Rs. 500/- (YEARS 1972)
(Rs Five Hundred Rupees Only)

This is to give notice to all person who may have objection to this Heirship Certificate Application may appear in THE COURT OF Hon'ble S.D. Panvel At Panvel within one month from the date of this proclamation, there to entire their objections, and it is hereby declared that if no sufficient objection is offered before the expiration of that period, the Judge Of The Hon'ble Court S.D. Panvel At Panvel will forthwith proceed to receive proof if the 1) MR. VINAYAK PANDURANG GATHADI, 2) MRS. ANAGHA SHREERAM SHALGAR 3) MR. ASHISH PANDURANG GATHADI right, and to grant her provided she shall appear to entitle thereto, a certificate of Heirship Certificate of the said deceased LATE SMT NIRMALA PANDURANG GATHADI
Date at 20 Dec, 2025

| Sd/- Jr.Clerk Civil Judge (S.D.) Panvel | Court Seal | Sd/- Asst.Supted. Civil Judge (S.D.) Panvel |
|---|---|---|

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे पिरकोन, तालुका उरण, जिल्हा रायगड, येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत ही १ ज्ञानेश्वर हरी पाटील २. बाळनाथ हरी पाटील ३. चंपा सदानंद ठाकुर ४ वनमाला प्रकाश पाटील ५. वासुदेव हरी पाटील ६. विश्वनाथ हरी पाटील ७. लता हरी पाटील यांच्या मालकीची मिळकत आहे.

**सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | पो.ख. | एकूण क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|---|---|
| पिरकोन | १८९ | १/अ/ब२ | ०.०९.३० | ०.१३.१० | ०.२२.४० | २.३६ |

नमुद केलेली मिळकत ही वरील कब्जेदारांच्या मालकी हक्कात व कब्जे वहीवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत आमचे खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबद्दल विद्यमान मालकाने सांगितले आहे. सदर मिळकतीवर कसलाही कुळ, वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनचिठ्ठी, साठकरार, खरेदीखत, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मॉर्गेज, संपादन भाडेपट्टा, मृत्युपत्रांकीत दान, जप्ती, कर्ज, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या हरकती खालील पत्त्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधुन कायदेशीर पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहित धरुन, तसेच त्यासंबधी कोणचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहित धरण्यात येईल, तसेच मागाहुन येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात घेतलेली हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. हे सर्वांस कळावे.

सदरची पेपर नोटीस देण्यात माझी कोणत्याही प्रकारची अडचण किंवा तक्रार नाही, म्हणुन मी या जाहीर नोटीसीवर सही करत आहे.
ठिकाण : उरण
दिनांक : २३/१२/२०२५

सही/-
**ॲड.स्वाती डी. कांबळे**
**ॲडव्होकेट-हायकोर्ट**

## वाचकांसाठी विनम्र सूचना

'दै.रायगड नगरी' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध प्रकारच्या जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनासंदर्भात वा सेवेसंदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'दै.रायगड नगरी' वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

Court Khandare Judge
Adv.Rahila Khan
9653383146

## PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE (SENIOR DIVISION) AT PANVEL
Civil M.A. No.1593/2025
Exh No.8/D
N.D. 7/02/2026

1. ABDUL AYUB ABDUL MANNAN KHAN
Aged about 56years, residing at:- krishna tower, A/401, PLOT NO-12,13, SEC-5E, KALAMBOLI NAVI MUMBAI-410 218, An Indian Inhabitant,
2. MOHAMMED YAHYA KHAN
Aged about 54years, residing at:- kohenoor heights, 7th floor, SEC-8E KALAMBOLI NAVI MUMBAI-410 218, An Indian Inhabitant,
3. MOHAMMAD AKHTAR KHAN
Aged about 51years, residing at:- krishna tower, B/601, PLOT NO-12,13, SEC-5E, KALAMBOLI NAVI MUMBAI-410 218, An Indian Inhabitant,
4. MOHD ARIF ABDUL MANNAN KHAN
Aged about 43years, residing at kohenoor tower, B/201, KALAMBOLI NAVI MUMBAI-410 218, An Indian Inhabitant, Applicant

Versus

NIL Respondent

Let it be known to all concerned that deceased Late Mr. ABDUL MANNAN ABDUL SATTAR KHAN who died on 14/12/2015 at MGM NEW BOMBAY HOSPITAL, SECTOR-3, VASHI, NAVI MUMBAI therefore the applicants have filed the Misc application 1593/2025 for HEIRSHIP CERTIFICATE under the provision of Bombay regulation act VIII of 1827.

SCHEDULE OF IMMOVABLE PROPERTY

That the deceased was 50% owner of the immovable property
KRISHNA TOWER, A/401, PLOT NO-12,13, SEC- 5E, KALAMBOLI NAVI MUMBAI-410 218

If any person/s have any objection title, claim share, or any kind of interest in the said property, which is more particularly described in the schedule hereinabove, is hereby invited.

Then they may appear in person or through their advocate, objecting this application in the court of civil judge S.D at Panvel, Dist - Raigad, Maharashtra. If no one appears and objects for the same within 30 days from the date of publication of this notice then this Hon'ble court will proceed to pass the necessary order thereon which please note.
Dated:- 22/12/2025

| Sd/- Jr.Clerk Civil Judge (S.D.) Panvel | Court Seal | Sd/- Asst.Supted. Civil Judge (S.D.) Panvel |
|---|---|---|

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत श्री. महादेव अनंत पाटील व सुमन भास्कर गायकवाड यांच्या वडीलोपार्जित मालकी हक्क व कब्जेवहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहेत. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका उरण, मे. दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा -रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील गाव मौजे खोपटे (कचरेपाडा), येथील मिळकती खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | भूमापन/ सर्व्हे नं. | एकूण क्षेत्र (हे.आर.प्र.) | पोटखराबा (हे.आर.प्र.) | आकार (पैसे) |
|---|---|---|---|---|
| १ | २८/६ | ०.०३.५० | ०.००.०० | ०.६६ |
| २ | २९/३ | ०.११.०० | ०.०१.४० | ०.०१ |
| ३ | ३१/२ | ०.०२.८० | ०.००.५० | ०.१६ |

यांसी चतुःसीमा वहिवाटीप्रमाणे आहेत. येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त.
रायगड, तारीखः २४ डिसेंबर २०२५

सही/-
**श्री. विनायक र. ताम्हणकर, वकिल**
**खरेदीदारातर्फे वकिल**
**३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी, शनी नगर,**
**मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३**
**भ्रमणध्वनी क्र. ८६६८५५१३१२**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत आमच्या अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:

मौजे : निगुडशेत, ता.तळा, जि.रायगड येथील मिळकत

| कब्जेदाराचे नाव | गट नं. | क्षेत्रफळ (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| अम्मार अब्दुल गफुर नवरंगे | २७९ | ०.४५.०० | ५.०० |
| | ४१४ | ०.९१.०० | ०.३७ |

सबब सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार, ॲडव्होकेट यांचेकडे अगर खाली नमुद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आणि बोजारहित व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजणेत येईल हे सर्व तमाम जनतेस कळावे.
दि.२३/१२/२०२५

सही/-
**ॲड.अपेक्षा दामोदर पाटील**
**भुमी लँडमार्क, ५०७ सेक्टर १७,**
**प्लॉट नं ३४/३४ अ, किया शोरुमच्या वरती,**
**खांदा कॉलनी नवीन पनवेल-४१०२०६**
**मो.नं. ७२७६४३७८३७**

मे. बडगुजर साहेब, यांचे कोर्टात
अर्जदारांतर्फे वकील : श्री संतोष जाधव

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
**दि.चौ.अर्ज क्र. ९७७/२०२४**
**नि.नं. : १३/ड**
**ने.ता.०६/०१/२०२६**

१. श्री. भाविन आशुतोष शर्मा
वय ४७ वर्षे, व्यवसाय : नोकरी,
राहणार : फ्लॅट क्रमांक डी-६१५, ६ वा मजला,
नॅशनल पार्क सीएचएस लि., भूखंड क्रमांक ४५२,
मोरज रिव्हरसाइड पार्क जवळ, तक्का, पनवेल ४१०२०६.
२. कु. मोनिका आशुतोष शर्मा उर्फ सौ मोनिका गौरव पटेल
वय ३८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
राहणार : बी१/१००६ व्हिवा सर्वेक्षण क्रमांक ३७,
हिसा क्रमांक १, डी मार्ट समोर, हिंजवडी,
पुणे ४१११०५७ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १ व २ यांची आई, कै. भारती आशुतोष शर्मा ह्या दिनांक १९ माहे मे सन २०२१ रोजी मु. फ्लॅट नं. डी-६१५, नॅशनल पार्क सीएचएस लि., प्लॉट नं. ४५२, मोरज रिव्हरसाइड पार्कजवळ, तक्का, पनवेल ४१०२०६ येथे त्यांच्या राहत्या घरी मयत झालेल्या आहेत. तसेच त्यांचे पती, आशुतोष रमेशचंद्र शर्मा हे दिनांक २९ माहे मे सन २०२० रोजी निधन झाले आहेत.

तसेच कै. भारती आशुतोष शर्मा यांचे मृत्यूपश्चात त्यांना हिंदू वारस कायद्याप्रमाणे अर्जदार क्र. १, भावीन आशुतोष शर्मा आणि अर्जदार क्र. २, मोनिका आशुतोष शर्मा उर्फ मोनिका गौरव पटेल हेच कायदेशीर वारस असून अन्य कोणीही मुले अथवा मुली वैगरे वारस नव्हते व नाहीत.

कै. भारती आशुतोष शर्मा यांचे सामाईक मालकीच्या, ताबेकब्जातील, वहिवाट खालील परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेप्रमाणे मिळकती होत्या. त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे:-

परिशिष्ट ''अ''

**SCHEDULE OF THE PROPERTY**

| Sr. No. | Particulars of the Properties / Investments | Current Market Value |
|---|---|---|
| 1) | 100% share in Five Fully Paid Up Shares of National Park Co-operative Housing Society Ltd. under Share Certificate No. 66 bearing Distinctive Nos. 331 to 335 both inclusive of the Face Value of Rupees Fifty Each together with the right, title and interest of Flat No. D-615, 6th Floor, National Park CHS Ltd., Plot No. 452, Near Moraj Riverside Park, Takka, Panvel 410206, having a Carpet Area of 665 sq. ft., Built Up Area 798 sq. ft. held in the name of the said deceased, Bharti Ashutosh Sharma. | Rs. 60,00,000.00 |
| 2 | Amount in UTI Mid Cap Fund- Regular Plan of KFin Technologies Limited, having their registered address at UTI Tower, Plot C-1, GN Block, Bandra Kurla Complex, Bandra (East), Mumbai 400051, under Folio No. 51438306576, ISIN : INF789F01794, Unique Client Code : MFUTIB0048 held in the name of the said deceased, Bharti Ashutosh Sharma. | Rs. 14,030.62 |
| 3 | Amount lying in Savings Bank Account No. 344802030047025 in Union Bank, Panvel Branch, situated at Plot No. 142/A, Middle Class Hsg., Soc., Panvel 410206 held in the name of the said deceased, Bharti Ashutosh Sharma. | Rs. 13,877.37 |
| 4 | Amount lying in Savings Bank Account No. 319302010013730 in Union Bank, Sion (E) Branch, situated at 169/B, New Sunita Apartment, Sion Main Road, Sion (East), Mumbai 400022 held in the name of the said deceased, Bharti Ashutosh Sharma. | Rs. 2,512.73 |
| 5 | Amount lying in Savings Bank Account No. 10107002793-3 in The Municipal Co-op. Bank Ltd., Mumbai, 7 Parel Branch situated at Parel, Mumbai, held in the name of the said deceased, Bharti Ashutosh Sharma. | Rs. 1,000.00 |
| | TOTAL | Rs. 60,31,420.72 |

कै. भारती आशुतोष शर्मा यांचे सामाईक मालकीच्या, ताबेकब्जातील, वहिवाट वरीलप्रमाणे परिशिष्ट ''अ'' मध्ये नमूद केलेल्या मिळकतीबाबत वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार क्र. १ व २ यांनी वरील दिवाणी चौकशी अर्ज क्र. ९७७/२०२४ पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात दाखल आहे.

त्याअर्थी, सदर वर नमूद केलेल्या मिळकती बाबत अर्जदार क्र. १ व २ हे कै. भारती आशुतोष शर्मा यांचे कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्र. १ व २ यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत ह्या कोर्टात हजर राहून हरकती कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या, मुदतीनंतर अर्जदार क्र. १ व २ यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख २० माहे डिसेंबर सन २०२५ माझ्या सही शिक्यानिशी दिले.

| सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

खासदार सुनील तटकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून...

# माजी सभापती व येरद ग्रामस्थांचा राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगाव तालुक्यातील निजामपूर विभागात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद वाढवणारा महत्त्वपूर्ण राजकीय घडामोडीचा क्षण साक्षीदार ठरला. येरद येथील माजी सभापती व माजी सरपंच मारुती मोकाशी यांच्यासह येरद गावातील असंख्य ग्रामस्थांनी शिवसेनेतून बाहेर पडत खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे निजामपूर विभागात शिवसेनेला मोठा राजकीय धक्का बसला असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला नवसंजीवनी मिळाली आहे.




सुतारवाडी येथे पार पडलेल्या या प्रवेश सोहळ्यास राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते तथा निजामपूर जिल्हा परिषद उमेदवार ॲड. राजीव साबळे, ज्येष्ठ नेते बाबूशेट खानविलकर, विभाग अध्यक्ष तुकाराम सुतार यांची प्रमुख उपस्थिती होती. मोठ्या संख्येने ग्रामस्थ सहभागी झाल्याने कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी बोलताना खासदार सुनील तटकरे यांनी माजी सभापती मारुती मोकाशी यांच्यासह येरद ग्रामस्थांचे पक्षात स्वागत करत समाधान व्यक्त केले. जनतेच्या प्रश्नांशी प्रामाणिक राहून काम करणारे अनुभवी नेतृत्व राष्ट्रवादीत येणे ही पक्षासाठी अभिमानाची बाब आहे. येरद गावातील पाणी, रस्ते, शिक्षण, आरोग्य अशा मूलभूत प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आम्ही कटिबद्ध असून विकासाची गंगा तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन त्यांनी दिले.

आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एकजुटीने काम करण्याचे आवाहन करत खासदार तटकरे म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करून आपल्या गावाचा सर्वांगीण विकास साधूया. विकासाच्या माध्यमातून येरद गावाला प्रगतीपथावर नेण्याचा निर्धार करूया.

यावेळी माजी सभापती मारुती मोकाशी व ग्रामस्थांनी शिवसेनेतील अनुभव कथन करताना सांगितले की, शिवसेनेत असताना आमच्या गावातील अनेक विकासकामे रखडली. दिलेली आश्वासने पूर्ण न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी होती. त्यामुळे विकासावर विश्वास ठेवणाऱ्या खासदार सुनील तटकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे.

या सर्व नवप्रवेशितांचे खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या प्रवेशामुळे निजामपूर विभागातील राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे स्पष्टपणे दिसू लागली असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आगामी निवडणुकांसाठी अधिक मजबूत होत असल्याचे चित्र आहे.

# वेश्या व्यवसायातून महिलांची गुन्हे शाखेतील पोलीसांनी केली सुटका

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वेश्याव्यवसायातुन ०१ बांगलादेशी अल्पवयीन पिडीत मुलगी व ०६ पिडीत महिला (त्यापैकी ०२ बांगलादेशी) महिलांची गुन्हे शाखेतील पोलीसांनी सुटका केली आहे .

पोलीस आयुक्त, मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अनैतिक व्यापार, अवैध धंदे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

त्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांना त्याचे गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली की, तळोजा एम.आय.डी.सी. येथील हॉटेल नवनाथ इन या लॉजिंगचा मॅनेजर हा लॉजमध्ये ग्राहकाकडुन २०००/- रूपये घेवुन लॉजमधील रूममध्ये ठेवलेल्या महिला दाखवुन, त्या महिलांकडुन वेश्या व्यवसाय करून घेत आहे. वपोनि घोरपडे यांनी त्यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे बनावट ग्राहकास हॉटेल नवनाथ इन या लॉजिंग मध्ये पाठवले. बनावट ग्राहकाच्या सांकेतीक इशाऱ्यावरून पथकाने लॉजवर छापा टाकला. त्याठिकाणी ०१ अल्पवयीन बांगलादेशी मुलगी व ६ पिडीत महिला वेश्यागमनाकरीता ठेवलेल्या मिळुन आल्या. लॉज मालक वसंत शेटटी, लॉज मॅनेजर गिरीश शेटटी, सर्व्हिस बॉय रोशन यादव यांनी अल्पवयीन मुलीस व पिडीत महिलांना प्राप्त करून त्यांना लॉजमध्ये ठेवल्या. सर्व्हिस बॉय रोशन



याने त्यांना बनावट ग्राहकास दाखवुन बनावट ग्राहकाने पसंद केलेल्या महिलेस वेश्यागमनाकरीता पाठवल्याचा मोबादला म्हणुन २०००/- रूपये बनावट ग्राहकाकडुन स्विकारले.

आरोपी वसंत गणेश शेटटी (लॉज मालक ,गिरीश विठठल शेटटी (लॉज मॅनेजर), रोशन रामजित यादव (सर्व्हिस बॉय) यांनी आपसात संगनमत करून ०१ अल्पवयीन बांगलादेशी मुलगी व ०६ महिला पैकी ०२ बांगलादेशी पिडीत महिलांना वेश्या व्यवसायाकरीता प्राप्त करून नमुद लॉजचा वेश्याव्यवसायासाठी वापर केला. म्हणून वरील ३ आरोपी विरूध्द भा. न्या.सं. कलम १४३ (३), १४३ (४), ३(५), सह अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा कलम १९५६ कलम ३. ४, ५, सह झजउडज कलम ४, ८, १२ अन्वये गुन्हा दाखल केला. पुढील तपास तळोजा पोलीस ठाणे करत आहे. सदरची कारवाई सहा. पोलीस आयुक्त, धर्मपाल बनसोडे, -क्ढण, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली वपोनिरी पृथ्वीराज घोरपडे, पोहवा मांडोळे, पोशि ठाकुर, पोशि चव्हाण, पोशि पारासुर, पोशि कोलते, पोहवा सविता म्हात्रे, पोहवा मनिषा पावडे, चालक पोहवा हाडे यांनी केली आहे.

# महेंद्रशेठ घरत रमले जहांगीरच्या कलादालनात छायाचित्रकारांचे केले कौतुक

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण नगरपालिकेच्या दिमाखदार विजयानंतर कार्यकर्त्यांनी उधळलेल्या गुलालाचा रविवारी (ता. २१) दुपारी महेंद्रशेठ घरत यांनी आनंद घेतला, तर सायंकाळी चक्क 'लेकर हम दिवाने दिल' या ऑकेस्ट्राचा. मात्र उरण नगरपालिकेच्या विजयाने हुरळून न जाता सोमवारी (ता. २२) महेंद्रशेठ घरत चक्क मुंबईतील सुप्रसिद्ध जहांगीर आर्ट गॅलरीच्या कलादालनात रमले. तेथे विविध छायाचित्रकारांची फोटोग्राफी पाहून ते हरखून गेले.



मुळात त्यांना स्वतःला फोटोग्राफीची खूप आवड आहे. त्यामुळे त्यांनी जहांगीर आर्ट गॅलरीतील प्रत्येक चित्र पाहून छायाचित्रकारांच्या कलेला दाद दिली.

बहुसंख्य छायाचित्रे निसर्गाचा अद्भुत चमत्कार दाखवत होती, अनेक चित्रांत नैसर्गिक जिवंतपणा होता, त्यामुळे प्रत्येक छायाचित्रातील बारकावे न्याहाळून छायाचित्रकारांशी संवाद साधला आणि आवडणारे छायाचित्र आणि फोटो आल्बम त्यांनी चक्क खरेदी करून खऱ्या अर्थाने छायाचित्रकारांना मनमुराद दाद दिली. छायाचित्रकारांचे अभिनंदन केले.

# जिल्ह्यात विविध ठिकाणी अल्पसंख्यांक हक्क दिवस उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

दि.१८ डिसेंबर हा दिवस अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून साजरा करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत अल्पसंख्याकांसाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबतची माहिती विविध माध्यमांतून अल्पसंख्याकांना दिली जाते. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली (गुरुवार, दि.१८ डिसेंबर २०२५) रोजी जिल्ह्यातील विविध ठिकाणी अल्पसंख्याक हक्क दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

अल्पसंख्यांक समाजाच्या हक्कांचे संरक्षण, समानता व सन्मान याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने अल्पसंख्यांक हक्क दिन जिल्ह्यात विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. संयुक्त राष्ट्र संघाने १९९२ मध्ये अल्पसंख्यांक हक्कांबाबत जाहीर केलेल्या घोषणेनुसार दरवर्षी १८ डिसेंबर रोजी हा दिवस पाळला जातो. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन व संबंधित विभागांच्या वतीने अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांना त्यांच्या घटनात्मक हक्कांबाबत माहिती देण्यात आली.

यावेळी भारताच्या संविधानातील कलम २९ व ३० नुसार अल्पसंख्यांकांना भाषा, लिपी व संस्कृती जतन करण्याचा तसेच शैक्षणिक संस्था स्थापन व व्यवस्थापनाचा अधिकार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच धर्मस्वातंत्र्य, समान संधी व शासकीय योजनांचा लाभ घेण्याचा हक्क याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. अल्पसंख्यांक म्हणजे कोण, भारतीय संविधानाने अल्पसंख्यांकांना कोण कोणते हक्क, अधिकार दिले आहेत, त्यांचे कर्तव्य काय आहेत, शासन अल्पसंख्यांकांसाठी कोणकोणत्या योजना राबविते, विद्यार्थी, वस्ती, कच्चे कैदी, पोलीस भरती, स्पर्धा परीक्षा, संस्था अनुदान, वैयक्तिक अनुदान, शिष्यवृत्ती, सामाजिक एकता अशा विविध क्षेत्राकरिता अल्पसंख्यांकांसाठी शासन कोणकोणत्या योजना व उपक्रम राबविते याविषयीची विस्तृत माहिती दिली.

कार्यक्रमादरम्यान समाजात सलोखा, बंधुता व सामाजिक एकात्मता वाढवण्याचे आवाहन करण्यात आले. विविधतेत एकता ही भारताची ओळख असून, अल्पसंख्यांक समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे यावेळी सांगण्यात आले. अल्पसंख्यांक हक्क दिनाच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये हक्कांबाबत जागरूकता वाढण्यास मदत होणार असल्याचे प्रशासनाकडून नमूद करण्यात आले

# विद्यार्थ्यांना मोफत पुस्तकांचे वाटप

**दै.रायगड नगरी । तळा**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा रायगड ग्रंथालय विभागामार्फत सोमवार दिनांक २२ डिसेंबर २०२५ रोजी ग्रंथालयात सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या पुस्तक पेढी योजनेअंतर्गत गरजू व गरीब विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव श्री मंगेश देशमुख, महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. भगवान लोखंडे होते. यावेळी ग्रंथपाल श्री. मनोज वाढवळ, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.ग्रंथालय परिचर श्री मंगेश पोळेकर यानी सुद्धा ही योजना महाविद्यालयात राबविताना खूप सहकार्य केले. तसेच यावेळी ग्रंथपाल श्री. मनोज वाढवळ यानी सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या पुस्तक पेढी योजना गरजू व गरीब विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्वाची असून त्यांनी १३७३ एवढी पुस्तके देऊन अंदाजे रक्कम २ लाख २० हजार ५५५ एवढी होत आहे. अशा या संस्थेचे अध्यक्ष /सचिव व आम्हाला सहकार्य करणारे मूरुटकर सर ,पाटील सर, रोकडे सर ,दया सर व इतर सहकारी या सर्वांचे आम्ही शतश : ऋणी आहोत अशा भावना व्यक्त केल्या. प्र. प्राचार्य डॉ. लोखंडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासात पुस्तकांचे महत्त्व अनन्यसाधारण असून आर्थिक अडचणींमुळे



शिक्षणात अडथळे येऊ नयेत, यासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज आहे. या पुस्तक वाटपामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत असून महाविद्यालयाच्या शैक्षणिक वातावरणाला सकारात्मक चालना मिळाली आहे. कार्यक्रमाच्या शेवटी पुस्तक दान करणाऱ्या संस्थेचे व सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानण्यात आले. या उपक्रमामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# राष्ट्रवादी पक्षाशी एक निष्ठ असलेली वारक आदिवासी वाडी २० वर्षे विकासा पासून वंचित मतदानावर बहिष्कार टाकणार : रमेश कोळी

**दै.रायगड नगरी । वावेदिवाळी इंदापूर**

इंदापूर विभागातील वारक ही आदिवासी वाडी मुंबई गोवा हायवे पासून सात ते आठ किलोमीटर अशी दुर्गम भागात वसलेले असून या आदिवासी वाडी मध्ये एकूण १५० घराचा उबरठा असून २५० मतदार आहेत या आदिवासी वाडीतील तरूण तरूणीची संख्या ही मोठ्या प्रमाणात असून काही तरूण तरूणी ह्या उच्च शिक्षण घेण्यासाठी या दुर्गम भागातून चालत शहरात जात असतात

ही वारक आदिवासी वाडी गेल्या अनेक वर्षापासून एक निष्ठेने २० वर्षे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे काम करत असून खा.सुनीलजी तटकरे साहेब ना.आदीतीताई तटकरे यांच्या पाठीशी ठामपणे प्रत्येक येणाऱ्या निवडणूकीत एक निष्ठेने ते काम करत आहेत. गेले वीस वर्षे राष्ट्रवादी पक्षा सोबत राहून देखील वारक आदिवासी वाडी ही विकासा पासून वंचित आहे असा आरोप वारक या आदिवासी वाडील समाज सेवक रमेश कोळी यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले

यावेळी त्यांनी पुढे बोलताना सांगितले की वारक असेव विघवळी मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा खा.सुनीलजी तटकरे साहेब तसेच ना.अदीतीताई तटकरे यांच्या फडातून विकास कामासाठी लाखो कोटी रूपयाचा निधी टाकला जात असून गावात येणारे रस्ते तसेच गावातील अंतर्गत रस्ते हे पक्के केले असून गावात पाण्याची सुविधा देखील ग्रामस्थान साठी व्यवस्थित पणे केली असून फक्त आदिवाडीच्या विकासाकडे यांच्या फडात पैसे मिळत नाही आदीवासी वाडीकडे दुर्लक्ष करून आम्हा विकासा पासून वंचित ठेवण्यात येत आहे. ना.आदीतीताई यांनी दोन वर्षापूर्वी आश्वासन दिले होते की तुम्हाला रस्त्यासाठी ३० लाखाचे पत्र देते ते देखील दिले नाही.आदिवासी वाडीत एखादी महिला प्रस्तुती साठी आडली तर तीला रूग्णालयात नेण्यासाठी रस्त्याच्या बिकट अवस्थेत मुले मोठी कसरत करावी लागते कुठलेही वाहन आदिवासी वाडीत येत नाही आमचे राष्ट्रवादीच्या नेत्यांना कार्यकत्याना एकच आव्हान आहे ते म्हणजे येणाऱ्या जि.प.तसेच प.स निवडणूकी मध्ये आम्ही वारक आदिवासीतील सर्व बाधव राष्ट्रवादी तसेच इतर कोणत्याही पक्षाला मतदान करणार नाही त्या दिवशी आम्ही मतदानावर बहिष्कार टाकू असे त्यांनी सांगितले

तसेच महिला वर्गातुन देखील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तसेच इतर पक्ष व त्यांचे राजकीय नेते पुढारी याच्या बाबत देखील नाराजी व खेद व्यक्त करण्यात आला असून या येणाऱ्या जि.प.व.प.स निवडणूकीत आम्ही राष्ट्रीवादीच्या किंवा इतर कोणत्याही पक्षाच्या उमेदवारांला मतदान करणार नाही त्या दिवशी रानात जाऊन बसू असा आदिवासी महिला वर्गानी एकत्रितपणे निर्णय घेऊन पवित्रा घेतला आहे.



# ऐनवहाळ येथे बिबट्याच्या हल्ल्यात बैलाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । कोलाड**

रोहा तालुक्यातील ऐनवहाळ हद्दीत मंगळवार दि.२३ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे सहा वाजण्याच्या सुमारास बिबट्याने एका बैलावर हल्ला केला असुन या हल्ल्यात बैलाचा मृत्यू झाल्याची घटना घडली असुन या घटनेमुळे या परिसरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

रोहा तालुक्यातील ऐनवहाल,डोळवहाल,रेवेचीवाडी तसेच चिंचवली तर्फे अतोणे परिसरातील असंख्य गावे घनदाट जंगल भागात वसलेली आहेत.या परिसरात बिबटयाचे दशहद निर्माण झाली असल्यामुळे येथील जागृत नागरिकांनी वन विभाग, पोलिस अधिकारी, तसेच सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था यांच्याशी संपर्क साधला असुन हे तिन्ही पथक घटना स्थळी दाखल झाले आहेत.त्यांनी बिबटयाची शोध मोहीम सुरु केली असल्याचे नागरिकांकडून सांगण्यात आले आहे.

या परिसरात बिबट्याने ऐनवहाल येथील पोलिस पाटील प्रकाश शांताराम मोरे यांच्या घरच्या गाईचा अंदाजे ३० हजार रुपये किंमतीचा खिल्लार बैल याचा बळी घेतला आहे.

# पनवेलमध्ये जमावबंदीचा आदेश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

निवडणूक आयोगाने दि. १५ डिसेंबर २०२५ रोजीचे अधिसुचनेनुसार महानगरपालिका निवडणुक २०२५ करीता निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून नवी मुंबई पोलीस आयुक्तायामधील नवी मुंबई महानगरपालिका पनवेल महानगरपालिका निवडणुकीकरीता २३ ते ३० डिसेंबर २०२५ रोजीपर्यंत निवडणुक कार्यक्रमांतर्गत उमेदवार किंवा त्यांच्या कोणत्याही सुचकाकडून नामनिर्देशन पत्रे स्वीकारण्यात येणार आहे.

तसेच उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा २ जानेवारी २०२६ आहे. त्या अनुषंगाने विविध राजकीय पक्ष नामनिर्देशन पत्र सादर करतेवळी उमेदवारांच्या समर्थनार्थ शक्ती प्रदर्शन करणे, विविध वाहनांचा वापर करणे, घोषणाबाजी करणे यामुळे किरकोळ कारणावरून वाद निर्माण होवून पक्ष कार्यकर्त्यामध्ये असंतोषाचे वातावरण तयार होते तसेच रहदारीच्या नियमनात अडथळा निर्माण होतो. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवून सार्वजनिक शांततेचा भंग होण्याची शक्यता आहे. त्यानुसार पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, नवी मुंबई रश्मी नांदेडकर यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून नवी मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामधील पनवेलमध्ये जमावबंदी आदेश जारी केले आहे.